.. Dasabodh by Samartha Ramadas Swami Chapter 14 ..

॥ समर्थ रामदासांचा दासबोध दशक १४ ॥

॥ दशक चौदावा : अखंडध्यान ॥ १४ ॥

समास पहिला : निस्पृह लक्षणनाम

॥ श्रीराम ॥

ऐका स्पृहाची सिकवण । युक्ति बुद्धि शाहाणपण ।
जेणें राहे समाधान । निरंतर ॥ १॥
सोपा मंत्र परी नेमस्त । साधें वोषध गुणवंत ।
साधें बोलणें सप्रचित । तैसें माझें ॥ २॥
तत्काळचि अवगुण जाती । उत्तम गुणाची होये प्राप्ती ।
शब्दवोषध तीव्र श्रोतीं । साक्षपें सेवावें ॥ ३॥
निस्पृहता धरूं नये । धरिली तरी सोडूं नये ।
सोडिली तरी हिंडों नये । वोळखीमधें ॥ ४॥
कांता दृष्टी राखों नये । मनास गोडी चाखऊं नये ।
धारिष्ट चळतां दाखऊं नये । मुख आपुलें ॥ ५॥
येकेस्थळीं राहों नये । कानकोंडें साहों नये ।
द्रव्य दारा पाहों नये । आळकेपणें ॥ ६॥
आचारभ्रष्ट होऊं नये । दिल्यां द्रव्य घेऊं नये ।
उणा शब्द येऊं नये । आपणावरी ॥ ७॥
भिक्षेविषीं लाजों नये । बहुत भिक्षा घेऊं नये ।
पुसतांहि देऊं नये । वोळखी आपली ॥ ८॥
धड मळिन नेसों नये । गोड अन्न खाऊं नये ।
दुराग्रह करूं नये । प्रसंगें वर्तावें ॥ ९॥
भोगीं मन असों नये । देहदुःखें त्रासों नये ।
पुढें आशा धरूं नये । जीवित्वाची ॥ १०॥
विरक्ती गळों देऊं नये । धारिष्ट चळों देऊं नये ।
ज्ञान मळिण होऊं नये । विवेकबळें ॥ ११॥
करुणाकीर्तन सोडूं नये । अंतर्ध्यान मोडूं नये ।
प्रेमतंतु तोडूं नये । सगुणमूर्तीचा ॥ १२॥
पोटीं चिंता धरूं नये । कष्टें खेद मानूं नये ।
समइं धीर सांडूं नये । कांहीं केल्या ॥ १३॥
अपमानितां सिणों नये । निखंदितां कष्टों नये ।
धिःकारितां झुरों नये । कांहीं केल्या ॥ १४॥
लोकलाज धरूं नये । लाजवितां लाजों नये ।
खिजवितां खिजों नये । विरक्त पुरुषें ॥ १५॥
शुद्ध मार्ग सोडूं नये । दुर्जनासीं तंडों नये ।
समंध पडों देऊं नये । चांडाळासी ॥ १६॥
तपीळपण धरूं नये । भांडवितां भांडों नये ।
उडवितां उडऊं नये । निजस्थिती आपुली ॥ १७॥
हांसवितां हासों नये । बोलवितां बोलों नये ।
चालवितां चालों नये । क्षणक्ष्णा ॥ १८॥
येक वेष धरूं नये । येक साज करूं नये ।
येकदेसी होऊं नये । भ्रमण करावें ॥ १९॥
सलगी पडों देऊं नये । प्रतिग्रह घेऊं नये ।
सभेमध्यें बैसों नये । सर्वकाळ ॥ २०॥
नेम आंगीं लाऊं नये । भरवसा कोणास देऊं नये ।
अंगीकार करूं नये । नेमस्तपणाचा ॥ २१॥
नित्यनेम सांडूं नये । अभ्यास बुडों देऊं नये ।
परतंत्र होऊं नये । कांहीं केल्यां ॥ २२॥
स्वतंत्रता मोडूं नये । निरापेक्षा तोडूं नये ।
परापेक्षा होऊं नये । क्षणक्ष्णा ॥ २३॥
वैभव दृष्टीं पाहों नये । उपाधीसुखें राहों नये ।
येकांत मोडूं देऊं नये । स्वरूपस्थितीचा ॥ २४॥
अनर्गळता करूं नये । लोकलाज धरूं नये ।
कोठेंतरी होऊं नये । आसक्त कदां ॥ २५॥
परंपरा तोडूं नये । उपाधी मोडूं देऊं नये ।
ज्ञानमार्ग सोडूं नये । कदाकाळीं ॥ २६॥
कर्ममार्ग सांडूं नये । वैराग्य मोडूं देऊं नये ।
साधन भजन खंडूं नये । कदाकाळीं ॥ २७॥
अतिवाद करूं नये । अनित्य पोटीं धरूं नये ।
रागें भरीं भरों नये । भलतीकडे ॥ २८॥
न मनी त्यास सांगों नये । कंटाळवाणें बोलों नये ।
बहुसाल असो नये । येकें स्थळीं ॥ २९॥
कांहीं उपाधी करूं नये । केली तरी धरूं नये ।
धरिली तरी सांपडों नये । उपाधीमध्यें ॥ ३०॥
थोरपणें असो नये । महत्त्व धरून बैसों नये ।
कांहीं मान इच्छूं नये । कोठेंतरी ॥ ३१॥
साधेपण सोडूं नये । सानेपण मोडूं नये ।
बळात्कारें जोडूं नये । अभिमान आंगीं ॥ ३२॥
अधिकारेवीण सांगों नये । दाटून उपदेश देऊं नये ।
कानकोंडा करूं नये । परमार्थ कदा ॥ ३३॥
कठीण वैराग्य सोडूं नये । कठीण अभ्यास सांडूं नये ।
कठिणता धरूं नये । कोणेकेविशइं ॥ ३४॥
कठीण शब्द बोलों नये । कठीण आज्ञा करूं नये ।
कठीण धीरत्व सोडूं नये । कांहीं केल्यां ॥ ३५॥
आपण आसक्त होऊं नये । केल्यावीण सांगों नये ।
बहुसाल मागों नये । शिष्यवर्गासी ॥ ३६॥

उद्धट शब्द बोलों नये । इंद्रियेंस्मरण करूं नये ।
शाक्तमार्गें भरों नये । मुक्तपणें भरीं ॥ ३७ ॥
नीच कृतीं लाजों नये । वैभव होतां माजों नये ।
क्रोधें भरीं भरों नये । जाणपणें ॥ ३८ ॥
थोरपणें चुकों नये । न्याये नीति सांडूं नये ।
अप्रमाण वर्तों नये । कांहीं केल्या ॥ ३९ ॥
कळल्यावीण बोलों नये । अनुमानें निश्चये करूं नये ।
सांगतां दुःख धरूं नये । मूर्खपणें ॥ ४० ॥
सावधपण सोडुं नये । व्यापकपण सांडुं नये ।
कदा सुख मानूं नये । निसुगपणाचें ॥ ४१ ॥
विकल्प पोटीं धरूं नये । स्वार्थआज्ञा करूं नये ।
केली तरी टाकूं नये । आपणास पुढें ॥ ४२ ॥
प्रसंगेंवीण बोलों नये । अन्वयेंवीण गाऊं नये ।
विचारेंवीण जाऊं नये । अविचारपंथें ॥ ४३ ॥
परोपकार सांडूं नये । परपीडा करूं नये ।
विकल्प पडों देऊं नये । कोणीयेकासी ॥ ४४ ॥
नेणपण सोडूं नये । महंतपण सांडूं नये ।
द्रव्यासाठीं हिंडों नये । कीर्तन करीत ॥ ४५ ॥
संशयात्मक बोलों नये । बहुत निश्चये करूं नये ।
निर्वाहेंवीण धरूं नये । ग्रंथ हातीं ॥ ४६ ॥
जाणपणें पुसों नये । अहंभाव दिसों नये ।
सांगेन ऐसें म्हणों नये । कोणीयेकासी ॥ ४७ ॥
ज्ञानगर्व धरूं नये । सहसा छळणा करूं नये ।
कोठें वाद घालुं नये । कोणीयेकासी ॥ ४८ ॥
स्वार्थबुद्धी जडों नये । कारबारीं पडों नये ।
कार्यकर्ते होऊं नये । राजद्वारीं ॥ ४९ ॥
कोणास भर्वसा देऊं नये । जड भिक्षा मागों नये ।
भिक्षेसाठीं सांगों नये । परंपरा आपुली ॥ ५० ॥
सोइरिकींत पडों नये । मध्यावर्ति घडों नये ।
प्रपंचाची जडों नये । उपाधी आंगीं ॥ ५१ ॥
प्रपंचप्रस्तीं जाऊं नये । बाष्कळ अन्न खाऊं नये ।
पाहुण्यासरिसें घेऊं नये । आमंत्रणें कदां ॥ ५२ ॥
श्राध पक्ष सटी सामासें । शांती फळशोबन बारसें ।
भोग राहाण बहुवसें । नवस व्रतें उद्यापनें ॥ ५३ ॥
तेथें निस्पृहें जाऊं नये । त्याचें अन्न खाऊं नये ।
येळिलवाणें करूं नये । आपणासी ॥ ५४ ॥
लग्नमुहुर्तीं जाऊं नये । पोटासाठीं गाऊं नये ।
मोलें कीर्तन करूं नये । कोठेंतरी ॥ ५५ ॥
आपली भिक्षा सोडूं नये । वारें अन्न खाऊं नये ।
निस्पृहासि घडों नये । मोलयात्रा ॥ ५६ ॥
मोलें सुकृत करूं नये । मोलपुजारी होऊं नये ।
दिल्हा तरी घेऊं नये । इनाम निस्पृहें ॥ ५७ ॥
कोठें मठ करूं नये । केला तरी तो धरूं नये ।
मठपती होऊन बैसों नये । निस्पृह पुरुषें ॥ ५८ ॥
निस्पृहें अवघेंचि करावें । परी आपण तेथें न सांपडावें ।
परस्परें उभारावें । भक्तिमार्गासी ॥ ५९ ॥
प्रेत्नेंविण राहों नये । आळस दृष्टी आणूं नये ।
देह अस्तां पाहों नये । वियोग उपासनेचा ॥ ६० ॥
उपाधीमध्यें पडों नये । उपाधी आंगीं जडों नये ।
भजनमार्ग मोडूं नये । निसंगळपणें ॥ ६१ ॥
बहु उपाधी करूं नये । उपाधीविण कामा नये ।
सगुणभक्ति सोडूं नये । विभक्ति खोटी ॥ ६२ ॥
बहुसाल धांवों नये । बहुसाल राहों नये ।
बहुत कष्ट करूं नये । असुदें खोटें ॥ ६३ ॥
बहुसाल बोलों नये । अबोलणें कामा नये ।
बहुत अन्न खाऊं नये । उपवास खोटा ॥ ६४ ॥
बहुसाल निजों नये । बहुत निद्रा मोडुं नये ।
बहुत नेम धरूं नये । बाश्कळ खोटें ॥ ६५ ॥
बहु जनीं असों नये । बहु आरण्य सेऊं नये ।
बहु देह पाळूं नये । आत्महत्या खोटी ॥ ६६ ॥
बहु संग धरूं नये । संतसंग सांडुं नये ।
कर्मठपण कामा नये । अनाचार खोटा ॥ ६७ ॥
बहु लोकिक सांडुं नये । लोकाधेन होऊं नये ।
बहु प्रीती कामा नये । निष्ठुरता खोटी ॥ ६८ ॥
बहु संशये धरूं नये । मुक्तमार्ग कामा नये ।
बहु साधनीं पडों नये । साधनेंवीण खोटें ॥ ६९ ॥
बहु विषये भोगूं नये । विषयत्याग करितां नये ।
देहलोभ धरूं नये । बहु त्रास खोटा ॥ ७० ॥
वेगळा अनुभव घेऊं नये । अनुभवेंवीण कामा नये ।
आत्मस्थिती बोलों नये । स्तब्धता खोटी ॥ ७१ ॥
मन उरों देऊं नये । मनेंवीण कामा नये ।
अलक्ष वस्तु लक्षा नये । लक्षेंवीण खोटें ॥ ७२ ॥
मनबुद्धिअगोचर । बुद्धीवीण अंधकार ।
जाणीवेचा पडो विसर । नेणीव खोटी ॥ ७३ ॥
ज्ञातेपण धरूं नये । ज्ञानेंवीण कामा नये ।
अतर्क्य वस्तु तर्का न ये । तर्केंवीण खोटें ॥ ७४ ॥
दृश्यस्मरण काम नये । विस्मरण पडों नये ।
कांहीं चर्चा करूं नये । केलीयावीण न चले ॥ ७५ ॥
जगीं भेद कामा नये । वर्णसंकर करूं नये ।
आपला धर्म उडऊं नये । अभिमान खोटा ॥ ७६ ॥
आशाबद्धत बोलों नये । विवेकेंवीण चालों नये ।
समाधान हालों नये । कांहीं केल्यां ॥ ७७ ॥
अबद्ध पोथी लेहों नये । पोथीवीण कामा नये ।
अबद्ध वाचूं नये । वाचिल्यावीण खोटें ॥ ७८ ॥
निस्पृहें वगत्रुत्व सांडूं नये । आशंका घेतां भांडों नये ।
श्रोतयांचा मानूं नये । वीट कदा ॥ ७९ ॥

हें सिकवण धरितां चित्तीं । सकळ सुखें वोळगती ।
आंगीं बाणें महंती । अकस्मात ॥ ८० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
निस्पृहलक्षणनाम समास पहिला ॥ १ ॥ १४.१

समास दुसरा : भिक्षानिरूपण

॥ श्रीराम ॥

ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा ।
वों भवति या पक्षा । रक्षिलें पाहिजे ॥ १ ॥
भिक्षा मागोन जो जेविला । तो निराहारी बोलिला ।
प्रतिग्रहावेगळा जाला । भिक्षा मागतां ॥ २ ॥
संतासंत जे जन । तेथें कोरान्न मागोन करी भोजन ।
तेणें केलें अमृतप्राशन । प्रतिदिनीं ॥ ३ ॥

॥ श्लोक ॥
भिक्षाहारी निराहारी । भिक्षा नैव प्रतिग्रहः ।
असंतो वापि संतो वा । सोमपानं दिने दिने ॥

ऐसा भिक्षेचा महिमा । भिक्षा माने सर्वोत्तमा ।
ईश्वराचा अगाध महिमा । तोहि भिक्षा मागे ॥ ४ ॥
दत्त गोरक्ष आदिकरुनी । सिद्ध भिक्षा मागती जनीं ।
निस्पृहता भिक्षेपासुनी । प्रगट होये ॥ ५ ॥
वार लाऊन बैसला । तरी तो पराधेन जाला ।
तैसीच नित्यावळीला । स्वतंत्रता कैंची ॥ ६ ॥
आठां दिवसां धान्य मेळविलें । तरी तें कंटाळवाणें जालें ।
प्राणी येकायेकीं चेवलें । नित्यनूतनतेपासुनी ॥ ७ ॥
नित्य नूतन हिंडावें । उदंड देशाटण करावें ।
तरीच भिक्षा मागतां बरवें । श्लाघ्यवाणें ॥ ८ ॥
अखंड भिक्षेच अभ्यास । तयास वाटेना परदेश ।
जिकडे तिकडे स्वदेश । भुवनत्रै ॥ ९ ॥
भिक्षां मागतां किरकों नये । भिक्षा मागतां लाजो नये ।
भिक्षा मागतां भागों नये । परिभ्रमण करावें ॥ १० ॥
भिक्षा आणि चमत्कार । च्वाकाटती लहानथोर ।
कीर्ति वर्णी निरंतर । भगवंताची ॥ ११ ॥
भिक्षा म्हणिजे कामधेनु । सदा फळ नव्हे सामान्यु ।
भिक्षेस करी जो अमान्यु । तो करंटा जोगी ॥ १२ ॥
भिक्षेनें वोळखी होती । भिक्षेनें भरम चुकती ।
सामान्य भिक्षा मान्य करिती । सकळ प्राणी ॥ १३ ॥
भिक्षा म्हणिजे निर्भये स्थिति । भिक्षेनें प्रगटे महंती ।
स्वतंत्रता ईश्वरप्राप्ती । भिक्षागुणें ॥ १४ ॥
भिक्षेस नाहीं आडथळा । भिक्षाहारी तो मोकळा ।
भिक्षेकरितां सार्थक वेळा । काळ जातो ॥ १५ ॥
भिक्षा म्हणिजे अमरवल्ली । जिकडे तिकडे लगडली ।
अवकाळीं फळदायेनी जाली । निर्ल्लजासी ॥ १६ ॥
पृथ्वीमधें देश नाना । फिरतां उपवासी मरेना ।
कोणे येके ठाई जना । जड नव्हे ॥ १७ ॥
गोरज्य वाणिज्य कृषी । त्याहून प्रतिष्ठा भिक्षेसी ।
विसंभों नये झोळीसी । कदाकाळीं ॥ १८ ॥
भिक्षेऐसें नाहीं वैराग्य । वैराग्यापरतें नाहीं भाग्य ।
वैराग्य नस्तां अभाग्य । येकदेसी ॥ १९ ॥
कांहीं भिक्षा आहे म्हणावें । अल्पसंतोषी असावें ।
बहुत आणितां घ्यावें । मुष्टी येक ॥ २० ॥
सुखरूप भिक्षा मागणें । ऐसी निस्पृहतेचीं लक्षणें ।
मृद वागविळास करणें । परम सौख्यकारी ॥ २१ ॥
ऐसी भिक्षेची स्थिती । अल्प बोलिलें येथामती ।
भिक्षा वांचवी विपत्ती । होणार काळीं ॥ २२ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
भिक्षानिरूपणनाम समास दुसरा ॥ २ ॥ १४.२

समास तिसरा : कवित्वकळानिरूपण

॥ श्रीराम ॥

कवित्व शब्दसुमनमाळा । अर्थ परिमळ आगळा ।
तेणें संतषट्पदकुळा । आनंद होये ॥ १ ॥
ऐसी माळा अंतःकरणीं । गुंफुन पूजा रामचरणीं ।
वोंकारतंत अखंडपणीं । खंडूं च नये ॥ २ ॥
परोपकाराकारणें । कवित्व अगत्य करणें ।
तया कवित्वाचीं लक्षणें । बोलिजेती ॥ ३ ॥
जेणें घडे भगवद्भक्ती । जेणें घडे विरक्ती ।
ऐसिया कवित्वाची युक्ती । आधीं वाढवावी ॥ ४ ॥
क्रियेवीण शब्दज्ञान । तया न मानिती सज्जन ।
म्हणौनी देव प्रसन्न । अनुतापें करावा ॥ ५ ॥
देवाचेन प्रसन्नपणें । जें जें घडे बोलणें ।
तें तें अत्यंत श्लाघ्यवाणें । या नाव प्रासादिक ॥ ६ ॥
धीट पाठ प्रसादिक । ऐसें बोलती अनेक ।
तरी हा त्रिविध विवेक । बोलिजेल ॥ ७ ॥
धीट म्हणिजे धीटपणें केलें । जें जें आपुल्या मनास आलें ।
बळेंचि कवित्व रचिलें । या नाव धीट बोलिजे ॥ ८ ॥
पाठ म्हणिजे पाठांतर । बहुत पाहिलें ग्रंथांतर ।
तयासरिखा उतार । आपणचि केला ॥ ९ ॥
सीघ्रचि कवित्व जोडिलें । दृष्टि पडिलें तें चि वर्णिलें ।
भक्तिवांचून जें केलें । त्या नाव धीटपाठ ॥ १० ॥
कामिक रसिक शृंघारिक । वीर हास्य प्रस्ताविक ।
कौतुक विनोद अनेक । या नाव धीटपाठ ॥ ११ ॥
मन जालें कामाकार । तैसेचि निघती उद्गार ।
धीटपाठें परपार । पाविजेत नाहीं ॥ १२ ॥
व्हावया उदरशांती । करणें लागे नरस्तुती ।
तेथें केली जे वित्पत्ति । त्या नाव धीटपाठ ॥ १३ ॥

कवित्व नसावें धीटपाठ । कवित्व नसावें खटपट ।
कवित्व नसावें उद्धट । पाषांडमत ॥ १४ ॥
कवित्व नसावें वादांग । कवित्व नसावें रसभंग ।
कवित्व नसावें रंगभंग । दृष्टांतहीन ॥ १५ ॥
कवित्व नसावें पाल्हाळ । कवित्व नसावें बाष्कळ ।
कवित्व नसावें कुटीळ । लक्षुनियां ॥ १६ ॥
हीन कवित्व नसावें । बोलिलेंचि न बोलावें ।
छंदभंग न करावें । मुद्राहीन ॥ १७ ॥
वित्पत्तिहीन तर्कहीन । कळाहीन शब्दहीन ।
भक्तिज्ञानवैराग्यहीन । कवित्व नसावें ॥ १८ ॥
भक्तिहीन जें कवित्व । तेंचि जाणावें ठोंबें मत ।
आवडीहीन जें वगत्रृत्व । कंटाळवाणें ॥ १९ ॥
भक्तिविण जो अनुवाद । तोचि जाणावा विनोद ।
प्रीतीविण संवाद । घडे केवी ॥ २० ॥
असो धीट पाठ तें ऐसें । नाथिलें अहंतेचें पिसें ।
आतां प्रसादिक तें कैसें । सांगिजेल ॥ २१ ॥
वैभव कांता कांचन । जयास वाटे हें वमन ।
अंतरीं लागलें ध्यान । सर्वोत्तमाचें ॥ २२ ॥
जयास घडीनें घडी । लागे भगवंतीं आवडी ।
चढती वाढती गोडी । भगवद्भजनाची ॥ २३ ॥
जो भगवद्भजनेंवीण । जाऊं नेदी येक क्षण ।
सर्वकाळ अंतःकरण । भक्तिरंगें रंगलें ॥ २४ ॥
जया अंतरी भगवंत । अचळ राहिला निवांत ।
तो स्वभावें जें बोलत । तें ब्रह्मनिरूपण ॥ २५ ॥
अंतरी बैसला गोविंद । तेणें लागला भक्तिछंद ।
भक्तीविण अनुवाद । आणीक नाहीं ॥ २६ ॥
आवडी लागली अंतरीं । तैसीच वदे वैखरी ।
भावें करुणाकीर्तन करी । प्रेमभरें नाचतु ॥ २७ ॥
भगवंतीं लागलें मन । तेणें नाठवे देहभान ।
शंका लज्या पळोन । दुरी ठेली ॥ २८ ॥
तो प्रेमरंगें रंगला । तो भक्तिमदें मातला ।
तेणें अहंभाव घातला । पायांतळीं ॥ २९ ॥
गात नाचत निशंक । तयास कैचे दिसती लोक ।
दृष्टीं त्रैलोक्यनायेक । वसोन ठेला ॥ ३० ॥
ऐसा भगवंतीं रंगला । आणीक कांहीं नलगे त्याला ।
स्वइछा वर्णूं लागला । ध्यान कीर्ती प्रताप ॥ ३१ ॥
नाना ध्यानें नाना मूर्ती । नाना प्रताप नाना कीर्ती ।
तयापुढें नरस्तुती । त्रुणतुल्य वाटे ॥ ३२ ॥
असो ऐसा भगवद्भक्त । जो ये संसारीं विरक्त ।
तयास मानिती मुक्त । साधुजन ॥ ३३ ॥
त्याचे भक्तीचें कौतुक । तयानव प्रसादिक ।
सहज बोलतां विवेक । प्रगट होय ॥ ३४ ॥
ऐका कवित्वलक्षण । केलेंच करूं निरूपण ।
जेणे निवे अंतःकर्ण । श्रोतयांचें ॥ ३५ ॥
कवित्व असावें निर्मळ । कवित्व असावें सरळ ।
कवित्व असावें प्रांजळ । अन्वयाचें ॥ ३६ ॥
कवित्व असावें भक्तिबळें । कवित्व असावें अर्थागळें ।
कवित्व असावें वेगळें । अहंतेसी ॥ ३७ ॥
कवित्व असावें कीर्तिवाड । कवित्व असावें रम्य गोड ।
कवित्व असावें जाड । प्रतापविषीं ॥ ३८ ॥
कवित्व असावें सोपें । कवित्व असावें अल्परूपें ।
कवित्व असावें सुल्लपें । चरणबंद ॥ ३९ ॥
मृदु मंजुळ कोमळ । भव्य अद्भुत विशाळ ।
गौल्य माधुर्य रसाळ । भक्तिरसें ॥ ४० ॥
अक्षरबंद पदबंद । नाना चातुर्य प्रबंद ।
नाना कौशल्यता छंदबंद । धाटी मुद्रा अनेक ॥ ४१ ॥
नाना युक्ती नाना बुद्धी । नाना कळा नाना सिद्धी ।
नाना अन्वये साधी । नाना कवित्व ॥ ४२ ॥
नाना साहित्य दृष्टांत । नाना तर्क धात मात ।
नाना संमती सिद्धांत । पूर्वपक्षेंसीं ॥ ४३ ॥
नाना गती नाना वित्पत्ती । नाना मती नाना स्फुर्ति ।
नाना धारणा नाना धृती । या नाव कवित्व ॥ ४४ ॥
शंका आशंका प्रत्योत्तरें । नाना काव्यें शास्त्राधारें ।
तुटे संशये निर्धारें । निर्धारितां ॥ ४५ ॥
नाना प्रसंग नाना विचार । नाना योग नाना विवर ।
नाना तत्वचर्चासार । या नाव कवित्व ॥ ४६ ॥
नाना साधनें पुरश्चरणें । नाना तपें तीर्थाटणें ।
नाना संदेह फेडणें । या नाव कवित्व ॥ ४७ ॥
जेणें अनुताप उपजें । जेणें लोकिक लाजे ।
जेणें ज्ञान उमजे । या नाव कवित्व ॥ ४८ ॥
जेणें ज्ञान हें प्रबळे । जेणें वृत्ती हे मावळें ।
जेणें भक्तिमार्ग कळे । या नाव कवित्व ॥ ४९ ॥
जेणें देहबुद्धी तुटे । जेणें भवसिंधु आटे ।
जेणें भगवंत प्रगटे । या नाव कवित्व ॥ ५० ॥
जेणें सद्बुद्धि लागे । जेणें पाषांड भंगे ।
जेणें विवेक जागे । या नाव कवित्व ॥ ५१ ॥
जेणें सद्वस्तु भासे । जेणें भास हा निरसे ।
जेणें भिन्नत्व नासे । या नाव कवित्व ॥ ५२ ॥
जेणें होये समाधान । जेणें तुटे संसारबंधन ।
जया मानिती सज्जन । तया नाव कवित्व ॥ ५३ ॥
ऐसें कवित्वलक्षण । सांगतां तें असाधारण ।
परंतु कांहींयेक निरूपण । बुझावया केलें ॥ ५४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
कवित्वकळानिरूपण समास तिसरा ॥ ३ ॥ १४.३

समास चौथा : कीर्तन लक्षण

॥ श्रीराम ॥

कलयुगीं कीर्तन करावें । केवळ कोमळ कुशळ गावें ।
कठीण कर्कश कुर्टें सांडावें । येकीकडे ॥ १ ॥
खटखट खुंटून टाकावी । खळखळ खळांसीं न करावी ।
खरें खोटें खवळों नेदावी । वृत्ति आपुली ॥ २ ॥
गर्वगाणें गाऊं नये । गातां गातां गळों नये ।
गोप्य गुज गर्जों नये । गुण गावे ॥ ३ ॥
घष्टणी घिसणी घस्मरपणें । घसर घसरूं घसा खाणें ।
घुमघुमों चि घुमणें । योग्य नव्हे ॥ ४ ॥
नाना नामे भगवंताचीं । नाना ध्यानें सगुणाचीं ।
नाना कीर्तनें कीर्तीचीं । अद्‌भुत करावीं ॥ ५ ॥
चकचक चुकावेना । चाट चावट चळावेना ।
चरचर चुरचुर लागेना । ऐसें करावें ॥ ६ ॥
छळछळ छळणा करूं नये । छळितां छळितां छळों नयें ।
छळणें छळणा करूं नये । कोणीयेकाची ॥ ७ ॥
जि जि जि जि म्हणावेना । जो जो जागे तो तो पावना ।
जपजपों जनींजनार्दना । संतुष्ट करावें ॥ ८ ॥
झिरपे झरे पाझरे जळ । झळके दुरुनी झळाळ ।
झडझडां झळकती सकळ । प्राणी तेथें ॥ ९ ॥
या या या या म्हणावें नलगे । या या या या उपाव नलगे ।
या या या या कांहीं च नलगे । सुबुद्धासी ॥ १० ॥
टक टक टक करूं नये । टाळाटाळी टिकों नये ।
टम टम टम टम लाऊं नये । कंटाळवाणी ॥ ११ ॥
ठस ठोंबस ठाकावेना । ठक ठक ठक करावेना ।
ठाकें ठमकें ठसावेना । मूर्तिध्यान ॥ १२ ॥
डळमळ डळमळ डकों नये । डगमग डगमग कामा नये ।
डंडळ डंडळ चुकों नये । हेंकाडपणें ॥ १३ ॥
ढिसाळ ढाला ढळती कुंचे । ढोबळा ढसकण डुले नाचे ।
ढळेचिना ढिगढिगांचे । कंटाळवाणे ॥ १४ ॥
नाना नेटक नागर । नाना नम्र गुणागर ।
नाना नेमक मधुर । नेमस्त गाणें ॥ १५ ॥
ताळ तुंबरे तानमानें । ताळबद्ध तंतगाणें ।
तूर्त तार्किक तनें मनें । तल्लिन होती ॥ १६ ॥
थर्थरां थरकती रोमांच । थै थै थै स्वरें उंच ।
थिरथिर थिरावे नाच । प्रेमळ भक्तांचा ॥ १७ ॥
दक्षदाक्षण्य दाटलें । बंदें प्रबंदें कोंदाटलें ।
दमदम दुमदुमों लागलें । जगदंतर ॥ १८ ॥
धूर्त तूर्त धावोन आला । धिंगबुद्धीनें धिंग जाला ।
धाकें धाकें धोकला । रंग अवघा ॥ १९ ॥
नाना नाटक नेटकें । नाना मानें तुकें कौतुकें ।
नाना नेमक अनेकें । विद्यापात्रें ॥ २० ॥
पाप पळोन गेलें दुरी । पुण्य पुष्कळ प्रगटे वरी ।
परतरतो परे अंतरीं । चटक लागे ॥ २१ ॥
फुकट फाकट फटवणें नाहीं । फटकळ फुगडी पिंगा नाहीं ।
फिकें फसकट फोल नाहीं । भकाध्या निंदा ॥ २२ ॥
बरें बरें बरें म्हणती । बाबा बाबा उदंड करिती ।
बळें बळेंचि बळाविती । कथेलागीं ॥ २३ ॥
भला भला भला लोकीं । भक्तिभावें भव्य अनेकीं ।
भूषण भाविक लोकीं । परोपकारें ॥ २४ ॥
मानेल तरी मानावें मनें । मत्त न व्हावें ममतेनें ।
मी मी मी मी बहुत जनें । म्हणिजेत आहे ॥ २५ ॥
येकें टोकत येकांपासीं । येऊं येऊं येती झडेसीं ।
या या या या असे तयासी । म्हणावें नलगे ॥ २६ ॥
राग रंग रसाळ सुरंगें । अंतर संगित रागें ।
रत्नपरीक्षा रत्नामागें । धांवती लोक ॥ २७ ॥
लवलवां लवती लोचन । लकलकां लकलें मन ।
लपलपों लपती जन । आवडीनें ॥ २८ ॥
वचनें वाउगीं वदेना । वावरेविवरे वसेना ।
वगत्रुत्वें निववी जना । विनित होउनी ॥ २९ ॥
सारासार समस्तांला । सिकऊं सिकऊं जनाला ।
साहित संगित सज्जनाला । बरें वाटे ॥ ३० ॥
खरेंखोटें खरें वाटलें । खर्खर खुर्खुर खुंटलें ।
खोटें खोटेपणें गेलें । खोटें म्हणोनियां ॥ ३१ ॥
शाहाणे शोधितां शोधेना । शास्त्रार्थ शृती बोधेना ।
शुक शारिकाशमेना । शब्द तयाचा ॥ ३२ ॥
हरुषें हरुषें हासिला । हाहाहोहोनें भुलला ।
हित होईना तयाला । परत्रीचें ॥ ३३ ॥
लक्षावें लक्षितां अलक्षीं । लक्षिलें लोचनातें लक्षी ।
लंगलें लयेतें अलक्षी । विहिंगममार्गें ॥ ३४ ॥
क्षेत्र क्षेत्रज्ञ क्षोभतो । क्षमा क्षमून क्ष्मवितो ।
क्ष्मणें क्षोभणें क्षेत्रज्ञ तो । सर्वां ठाईं ॥ ३५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
कीर्तन लक्षण निरूपण समास चौथा ॥ ४ ॥ १४.४

समास पांचवा : हरिकथा लक्षण

॥ श्रीराम ॥

मागां हरिकथेचें लक्षण । श्रोतीं केला होता प्रस्न ।
सावध होऊन विचक्षण । परिसोन आतां ॥ १ ॥
हरिकथा कैसी करावी । रंगें कैसी भरावी ।
जेणें पाविजे पदवी । रघुनाथकृपेची ॥ २ ॥
सोनें आणि परिमळे । युक्षदंडा लागती फळें ।
गौल्य माधुर्य रसाळें । तरी ते अपूर्वता ॥ ३ ॥
तैसा हरिदास आणि विरक्त । ज्ञाता आणि प्रेमळ भक्त ।
वित्पन्न आणि वादरहित । तरी हेहि अपूर्वता ॥ ४ ॥
रागज्ञानी ताळज्ञानी । सकळकळा ब्रह्मज्ञानी ।
निराभिमानें वर्ते जनीं । तरी हेहि अपूर्वता ॥ ५ ॥
मछर नाहीं जयासी । जो अत्यंत प्रिये सज्जनासी ।
चतुरांग जाणें मानसीं । अंतरनिष्ठ ॥ ६ ॥

जयंत्यादिकें नाना पर्वें । तीर्थें क्षेत्रें जें अपूर्वें ।
जेथें वसिजे देवाधिदेवें । सामर्थ्यरूपें ॥ ७ ॥
तया तीर्थातें जे न मानिती । शब्दज्ञानें मिथ्या म्हणती ।
तया पामरां श्रीपती । जोडेल कैंचा ॥ ८ ॥
निर्गुण नेलें संदेहानें । सगुण नेलें ब्रह्मज्ञानें ।
दोहिकडे अभिमानें । वोस केलें ॥ ९ ॥
पुढें असतां सगुणमूर्ती । निर्गुणकथा जे करिती ।
प्रतिपादून उच्छेदिती । तेचि पढतमूर्ख ॥ १० ॥
ऐसी न कीजे हरिकथा । अंतर पडे उभये पंथा ।
परिस लक्षणें आतां । हरिकथेचीं ॥ ११ ॥
सगुणमूर्तीपुढें भावें । करुणाकीर्तन करावें ।
नानाध्यानें वर्णावें । प्रतापकीर्तीतें ॥ १२ ॥
ऐसें गातां स्वभावें । रसाळ कथा वोढवे ।
सर्वांतरीं हेलावे । प्रेमसुख ॥ १३ ॥
कथा रचायाची खूण । सगुणीं नाणावें निर्गुण ।
न बोलावे दोष गुण । पुढिलांचे कदा ॥ १४ ॥
देवाचें वर्णावें वैभाव । नाना प्रकारें महत्त्व ।
सगुणीं ठेउनियां भाव । हरिकथा करावी ॥ १५ ॥
लाज सांडून जनाची । आस्था सांडून धनाची ।
नीच नवी कीर्तनाची । आवडी धरावी ॥ १६ ॥
नम्र होऊन राजांगणीं । निःशंक जावें लोटांगणी ।
करताळिका नृत्य वाणीं । नामघोषें गर्जावें ॥ १७ ॥
येकांची कीर्ति येकापुढें । वर्णितां साहित्य न पडे ।
म्हणोनियां निवाडे । जेथील तेथें ॥ १८ ॥
मूर्ती नस्तां सगुण । श्रवणीं बैसले साधुजन ।
तरी अद्वैतनिरूपण । अवश्य करावें ॥ १९ ॥
नाहीं मूर्ती नाहीं सज्जन । श्रवणीं बैसले भाविक जन ।
तरी करावें कीर्तन । प्रस्ताविक वैराग्य ॥ २० ॥
श्रुंघारिक नवरसिक । यामधें सांडावें येक ।
स्त्रियादिकांचें कौतुक । वर्णुं नये कीं ॥ २१ ॥
लावण्य स्त्रियांचें वर्णितां । विकार बाधिजे तत्वता ।
धारिष्टापासून श्रोता । चळे तत्काळ ॥ २२ ॥
म्हणउन तें तजावें । जें बाधक साधकां स्वभावें ।
घेतां अंतरीं ठसावें । ध्यान स्त्रियांचें ॥ २३ ॥
लावण्य स्त्रियांचें ध्यान । कामाकार जालें मन ।
कैचें आठवेल ध्यान । ईश्वराचें ॥ २४ ॥
स्त्री वर्णितां सुखावला । लावण्याचे भरीं भरला ।
तो स्वयें जाणावा चेवला । ईश्वरापासुनी ॥ २५ ॥
हरिकथेसी भावबळें । गेला रंग तो तुंबळे ।
निमिष्य येक जरी आकळे । ध्यानीं परमात्मा ॥ २६ ॥
ध्यानीं गुंतलें मन । कैचें आठवेल जन ।
निशंक निर्लज कीर्तन । करितां रंग माजे ॥ २७ ॥
रागज्ञान ताळज्ञान । स्वरज्ञानेंसीं वित्पन्न ।
अर्थान्वयाचें कीर्तन । करूं जाणे ॥ २८ ॥
छपन्न भाषा नाना कळा । कंठमाधुर्य कोकिळा ।
परी तो भक्तिमार्ग वेगळा । भक्त जाणती ॥ २९ ॥
भक्तांस देवाचें ध्यान । देवावांचून नेणें अन्न ।
कळावंतांचें जें मन । तें कळाकार जालें ॥ ३० ॥
श्रीहरिवीण जे कळा । तेचि जाणावी अवकळा ।
देवास सांडून वेगळा । प्रत्यक्ष पडिला ॥ ३१ ॥
सर्पी वेढिलें चंदनासी । निधानाआड विवसी ।
नाना कळा देवासी । आड तैस्या ॥ ३२ ॥
सांडून देव सर्वज्ञ । नादामध्यें व्हावें मग्न ।
तें प्रत्यक्ष विघ्न । आडवें आलें ॥ ३३ ॥
येक मन गुंतलें स्वरीं । कोणें चिंतावा श्रीहरी ।
बळेंचि धरुनियां चोरीं । शिश्रूषा घेतली ॥ ३४ ॥
करितां देवाचें दर्शन । आडवें आलें रागज्ञान ।
तेणें धरुनियां मन । स्वरामागें नेलें ॥ ३५ ॥
भेटों जातां राजद्वारीं । बळेंचि धरिला बेगारी ।
कळावंतां तैसी परी । कळेनें केली ॥ ३६ ॥
मन ठेऊन ईश्वरीं । जो कोणी हरिकथा करी ।
तोचि ये संसारीं । धन्य जाणा ॥ ३७ ॥
जयास हरिकथेची गोडी । उठे नीच नवी आवडी ।
तयास जोडली जोडी । सर्वोत्तमाची ॥ ३८ ॥
हरिकथा मांडली जेथें । सर्व सांडून धावे तेथें ।
आलस्य निद्रा दवडून स्वार्थें । हरिकथेसि सादर ॥ ३९ ॥
हरिभक्तांचिये घरीं । नीच कृत्य अंगिकारी ।
साहेभूत सर्वांपरीं । साक्षपें होये ॥ ४० ॥
या नावाचा हरिदास । जयासि नामीं विश्वास ।
येथून हा समास । संपूर्ण जाला ॥ ४१ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
हरिकथालक्षणनिरूपण समास पांचवा ॥ ५ ॥ १४.५

समास सहावा : चातुर्य लक्षण

॥ श्रीराम ॥

रूप लावण्य अभ्यासितां न ये । सहजगुणास न चले उपाये ।
कांहीं तरी धरावी सोये । अगांतुक गुणाची ॥ १ ॥
काळें माणुस गोरें होयेना । वनाळास येत्न चालेना ।
मुक्यास वाचा फुटेना । हा सहजगुण ॥ २ ॥
आंधळें डोळस होयेना । बधिर तें ऐकेना ।
पांगुळ पाये घेइना । हा सहजगुण ॥ ३ ॥
कुरूपतेचीं लक्षणें । किती म्हणोनि सांगणें ।
रूप लावण्य याकारणें । पालटेना ॥ ४ ॥
अवगुण सोडितां जाती । उत्तम गुण अभासितां येती ।
कुविद्या सांडून सिकती । शाहाणे विद्या ॥ ५ ॥
मूर्खपण सांडितां जातें । शाहाणपण सिकतां येतें ।
कारबार करितां उमजतें । सकळ कांहीं ॥ ६ ॥

मान्यता आवडे जीवीं । तरी कां उपेक्षा करावी ।
चातुर्येंविण उंच पदवी । कदापी नाहीं ॥ ७॥
ऐसी प्रचीत येते मना । तरी कां स्वहित कराना ।
सन्मार्गें चालतां जनां । सज्जना माने ॥ ८॥
देहे नेटकें श्रुंघारिलें । परी चातुर्येंविण नासलें ।
गुणेंविण साजिरें केलें । बाष्कळ जैसें ॥ ९॥
अंतर्कळा शृंघारावी । नानापरी उमजवावी ।
संपदा मेळऊन भोगावी । सावकास ॥ १०॥
प्रेत्न करीना सिकेना । शरीर तेंहि कष्टविना ।
उत्तम गुण घेईना । सदाकोपी ॥ ११॥
आपण दुसऱ्यास करावें । तें उसिणें सवेंचि घ्यावें ।
जना कष्टवितां कष्टावें । लागेल बहु ॥ १२॥
न्यायें वर्तेल तो शहाणा । अन्याइ तो दैन्यवाणा ।
नाना चातुर्याच्या खुणा । चतुर जाणे ॥ १३॥
जें बहुतांस मानलें । तें बहुतीं मान्य केलें ।
येर तें वेर्थचि गेलें । जगनिंद्य ॥ १४॥
लोक आपणासि वोळावे । किंवा आवघेच कोंसळावे ।
आपणास समाधान फावे । ऐसें करावें ॥ १५॥
समाधानें समाधान वाढे । मित्रिनें मित्रि जोडे ।
मोडितां क्षणमात्रें मोडे । बरेपण ॥ १६॥
अहो कांहो अरे कांरे । जनीं ऐकिजेतें किं ते ।
कळत असतांच कां रे । निकामीपन ॥ १७॥
चातुर्यें श्रुंघारे अंतर । वस्त्रें श्रुंघारे शरीर ।
दोहिमधें कोण थोर । बरें पाहा ॥ १८॥
बाह्याकार श्रुंगारिलें । तेणें लोकांच्या हातासि काये आलें ।
चातुर्यें बहुतांसी रक्षिलें । नाना प्रकारें ॥ १९॥
बरें खावें बरें जेवावें । बरें ल्यावें बरें नेसावें ।
समस्तीं बरें म्हणावें । ऐसी वासना ॥ २०॥
तनें मनें झिजावें । तेणें भले म्हणोन घ्यावें ।
उगें चि कल्पितां सिणावें । लागेल पुढें ॥ २१॥
लोकीं कार्यभाग आडे । तो कार्यभाग जेथें घडे ।
लोक सहजचि वोढे । कामासाठीं ॥ २२॥
म्हणोन दुरऱ्यास सुखी करावें । तेणें आपण सुखी व्हावें ।
दुसऱ्यास कष्टवितां कष्टावें । लागेल स्वयें ॥ २३॥
हें तों प्रगटचि आहे । पाहिल्याविण कामा नये ।
समजणें हा उपाये । प्राणीमात्रासी ॥ २४॥
समजले आणि वर्तले । तेचि भाग्यपुरुष जाले ।
यावेगळे उरले । तें करंटे पुरुष ॥ २५॥
जितुका व्याप तितुकें वैभव । वैभवासारिखा हावभाव ।
समजले पाहिजे उपाव । प्रगटचि आहे ॥ २६॥
आळसें कार्येभाग नासतो । साक्षेप होत होत होतो ।
दिसते गोष्टी कळेना तो । शाहाणा कैसा ॥ २७॥
मित्रि करितां होतें कृत्य । वैर करितां होतो मृत्यु ।
बोलिलें हें सत्य किं असत्य । वोळखावें ॥ २८॥
आपणास शाहाणें करूं नेणें । आपलें हित आपण नेणें ।
जनीं मैत्रि राखों नेणे । वैर करी ॥ २९॥
ऐसे प्रकारीचे जन । त्यास म्हणावें अज्ञान ।
तयापासीं समाधान । कोण पावे ॥ ३०॥
आपण येकायेकी येकला । सृष्टींत भांडत चालिला ।
बहुतांमध्यें येकल्याला । येश कैचें ॥ ३१॥
बहुतांचे मुखी उरावें । बहुतांचे अंतरीं भरावें ।
उत्तम गुणीं विवरावें । प्राणीमात्रासी ॥ ३२॥
शाहाणे करावे जन । पतित करावे पावन ।
सृष्टिमधें भगवद्भजन । वाढवावें ॥ ३३॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
चातुर्येलक्षणनिरूपण समास सहावा ॥ ६॥ १४.६

समास सातवा : युगधर्म निरूपण

॥ श्रीराम ॥

नाना वेश नाना आश्रम । सर्वांचें मूळ गृहस्थाश्रम ।
जेथें पावती विश्राम । त्रैलोक्यवासी ॥ १॥
देव ऋषी मुनी योगी । नाना तापसी वीतरागी ।
पितृआदिकरून विभागी । अतीत अभ्यागत ॥ २॥
गृहस्थाश्रमीं निर्माण जाले । आपला आश्रम टाकून गेले ।
परंतु गृहस्थागृहीं हिंडों लागले । कीर्तिरूपें ॥ ३॥
याकारणें गृहस्थाश्रम । सकळामधें उत्तमोत्तम ।
परंतु पाहिजे स्वधर्म । आणी भूतदया ॥ ४॥
जेथें शडकर्में चालती । विध्योक्त क्रिया आचरती ।
वाग्माधुर्यें बोलती । प्राणीमात्रासी ॥ ५॥
सर्वप्रकारें नेमक । शास्त्रोक्त करणें कांहींयेक ।
त्याहिमध्यें अलोलिक । तो हा भक्तिमार्ग ॥ ६॥
पुरश्चरणी कायाक्लेसी । दृढव्रती परम सायासी ।
जगदीशावेगळें जयासी । थोर नाहीं ॥ ७॥
काया वाचा जीवें प्राणें । कष्टे भगवंताकारणें ।
मनें घेतलें धरणें । भजनमार्गीं ॥ ८॥
ऐसा भगवंताचा भक्त । विशेष अंतरीं विरक्त ।
संसार सांडून जाला मुक्त । देवाकारणें ॥ ९॥
अंतरापासून वैराग्य । तेंचि जाणावें महद्भाग्य ।
लोलंगतेयेवढें अभाग्य । आणीक नाहीं ॥ १०॥
राजे राज्य सांडून गेले । भगवंताकारणें हिंडलें ।
कीर्तिरूपें पावन जाले । भूमंडळीं ॥ ११॥
ऐसा जो कां योगेश्वर । अंतरीं प्रत्ययाचा विचार ।
उकलूं जाणे अंतर । प्राणीमात्रांचें ॥ १२॥
ऐसी वृत्ति उदासीन । त्याहिवरी विशेष आत्मज्ञान ।
दर्शनमात्रें समाधान । पावती लोक ॥ १३॥
बहुतांसी करी उपाये । तो जनाच्या वाट्या न ये ।
अखंड जयाचे हृदये । भगवद्रूप ॥ १४॥

जनास दिसे हा दुश्चित । परी तो आहे सावचित ।
अखंड जयाचें चित्त । परमेश्वरीं ॥ १५ ॥
उपासनामूर्तिध्यानीं । अथवा आत्मानुसंधानीं ।
नाहीं तरी श्रवणमननीं । निरंतर ॥ १६ ॥
पूर्वजांच्या पुण्यकोटी । संग्रह असिल्या गांठीं ।
तरीच ऐसीयाची भेटी । होये जनासी ॥ १७ ॥
प्रचीतिविण जें ज्ञान । तो आवघाचि अनुमान ।
तेथें कैंचें परत्रसाधन । प्राणीयासी ॥ १८ ॥
याकारणें मुख्य प्रत्यये । प्रचीतिविण काम नये ।
उपायासारिखा अपाये । शाहाणे जाणती ॥ १९ ॥
वेडें संसार सांडून गेलें । तरी तें कष्टकष्टोंचि मेलें ।
दोहिकडे अंतरलें । इहलोक परत्र ॥ २० ॥
रागें रागें निघोन गेला । तरी तो भांडभांडोंचि मेला ।
बहुत लोक कष्टी केला । आपणहि कष्टी ॥ २१ ॥
निघोन गेला परी अज्ञान । त्याचे संगती लागले जन ।
गुरु शिष्य दोघे समान । अज्ञानरूपें ॥ २२ ॥
आशावादी अनाचारी । निघोनि गेला देशांतरीं ।
तरी तो अनाचारचि करी । जनामध्यें ॥ २३ ॥
गृहीं पोटेविण कष्टती । कष्टी होऊन निघोन जाती ।
त्यास ठाईं ठाईं मारिती । चोरी भरतां ॥ २४ ॥
संसार मिथ्या ऐसा कळला । ज्ञान समजोन निघोन गेला ।
तेणें जन पावन केला । आपणाऐसा ॥ २५ ॥
येके संगतीनें तरती । येके संगतीनें बुडती ।
याकारणें सत्संगती । बरी पाहावी ॥ २६ ॥
जेथें नाहीं विवेकपरीक्षा । तेथें कैंची असेल दीक्षा ।
घरोघरीं मागतां भिक्षा । कोठेंहि मिळेना ॥ २७ ॥
जो दुसऱ्याचें अंतर जाणे । देश काळ प्रसंग जाणे ।
तया पुरुषा काय उणें । भूमंडळीं ॥ २८ ॥
नीच प्राणी गुरुत्व पावला । तेथें आचारचि बुडाला ।
वेदशास्त्रब्राह्मणाला । कोण पुसे ॥ २९ ॥
ब्रह्मज्ञानाचा विचारू । त्याचा ब्राह्मणासीच अधिकारू ।
वर्णानां ब्राह्मणो गुरुः । ऐसें वचन ॥ ३० ॥
ब्राह्मण बुद्धिपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले ।
गुरुत्व सांडून जाले । शिष्य शिष्यांचे ॥ ३१ ॥
कित्येक दावलमलकास जाती । कित्येक पीरास भजती ।
कित्येक तुरुक होती । आपले इछेनें ॥ ३२ ॥
ऐसा कलयुगींचा आचार । कोठें राहिला विचार ।
पुढें पुढें वर्णसंकर । होणार आहे ॥ ३३ ॥
गुरुत्व आले नीचयाती । कांहींयेक वाढली महंती ।
शूद्र आचार बुडविती । ब्राह्मणाचा ॥ ३४ ॥
हें ब्राह्मणास कळेना । त्याची वृत्तिच वळेना ।
मिथ्या अभिमान गळेना । मूर्खपणाचा ॥ ३५ ॥
राज्य नेलें म्लेंचिं क्षेत्रीं । गुरुत्व नेलें कुपात्रीं ।
आपण अरत्रीं ना परत्रीं । कांहींच नाहीं ॥ ३६ ॥
ब्राह्मणास ग्रामणीनें बुडविलें । विष्णूनें श्रीवत्स मिरविलें ।
त्याच विष्णूनें श्रापिलें । फरशरामें ॥ ३७ ॥
आम्हीहि तेचि ब्राह्मण । दुःखें बोलिलें हें वचन ।
वडिल गेले ग्रामणी करून । आम्हां भोवतें ॥ ३८ ॥
आतांचे ब्राह्मणीं काये केलें । अन्न मिळेना ऐसें जालें ।
तुम्हा बहुतांचे प्रचितीस आलें । किंवा नाहीं ॥ ३९ ॥
बरें वडिलांस काये म्हणावें । ब्राह्मणाचें अदृष्ट जाणावें ।
प्रसंगें बोलिलें स्वभावें । क्षमा केलें पाहिजे ॥ ४० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
युगधर्म निरूपण समास सातवा ॥ ७ ॥ १४.७

समास आठवा : अखंड ध्यान निरूपण

॥ श्रीराम ॥

बरें ऐसा प्रसंग जाला । जाला तो होऊन गेला ।
आतां तरी ब्राह्मणीं आपणाला । शाहाणे करावें ॥ १ ॥
देव पुजावा विमळहस्तीं । तेणें भाग्य पाविजे समस्तीं ।
मूर्ख अभक्त वेस्तीं । दरिद्र भोगिजे ॥ २ ॥
आधीं देवासवोळखावें । मग अनन्यभावें भजावें ।
अखंड ध्यानचि धरावें । सर्वोत्तमाचें ॥ ३ ॥
सर्वांमधें जो उत्तम । तया नाव सर्वोत्तम ।
आत्मानात्मविवेकवर्म । ठाईं पाडावें ॥ ४ ॥
जाणजाणों देह रक्षी । आत्मा द्रष्टा अंतरसाक्षी ।
पदार्थमात्रास परीक्षी । जाणपणें ॥ ५ ॥
तो सकळ देहामधें वर्ततो । इंद्रियेंग्राम चेष्टवितो ।
प्रचितीनें प्रत्यये येतो । प्राणीमात्रीं ॥ ६ ॥
प्राणीमात्रीं जगदांतरें । म्हणोनि राखावीं अंतरें ।
दाता भोक्ता परस्परें । सकळ कांहीं ॥ ७ ॥
देव वर्ततो जगदांतरी । तोचि आपुलें अंतरीं ।
त्रैलोकींचे प्राणीमात्रीं । बरें पाहा ॥ ८ ॥
मुळीं पाहाणार तो येकला । सकळां ठाईं विभागला ।
देहप्रकृतीनें जाला । भिन्न भिन्न ॥ ९ ॥
भिन्न भासें देहाकारें । प्रस्तुता येकचि अंतरें ।
बोलणें चालणें निर्धारें । त्यासीच घडे ॥ १० ॥
आपुले पारिखे सकळ लोक । पक्षी स्वापद पश्वादिक ।
किडा मुंगी देहधारक । सकळ प्राणी ॥ ११ ॥
खेचर भूचर वनचर । नाना प्रकारें जळचर ।
चत्वार खाणी विस्तार । किती म्हणोन सांगावा ॥ १२ ॥
समस्त जाणीवेनें वर्तती । रोकडी पाहावी प्रचिती ।
त्याची आपुली संगती । अखंड आहे ॥ १३ ॥
जगदांतरें वोळला धणी । किती येकवटील प्राणी ।
परी ते वोळायाची करणी । आपणापासीं ॥ १४ ॥
हें आपणाकडेंच येतें । राजी राखिजे समस्तें ।
देहासि बरें करावें तें । आत्मयास पावे ॥ १५ ॥

दुर्जन प्राणी त्यांतील देव । त्याचा लाताड स्वभाव ।
रागास आला जरी राव । तरी तंडों नये कीं ॥ १६ ॥
प्रसंगीं सांडीच करणें । पुढें विवेकें विवरणें ।
विवेकें सज्जनचि होणें । सकळ लोकीं ॥ १७ ॥
आत्मत्वीं दिसतो भेद । हा अवघाचि देहसमंध ।
येका जीवनें नाना स्वाद । औषधीभेदें ॥ १८ ॥
गरळ आणि अमृत जालें । परी आपपण नाहीं गेलें ।
साक्षत्वें आत्मयास पाहिलें । पाहिजे तैसें ॥ १९ ॥
अंतरनिष्ठ जो पुरुष । तो अंतरनिष्ठेनें विशेष ।
जगामधें जो जगदीश । तो तयास वोळखे ॥ २० ॥
नयनेंचि पाहावा नयेन । मनें शोधावें मन ।
तैसाचि हा भगवान । सकळां घटीं ॥ २१ ॥
तेणेंविण कार्यभाग आडे । सकळ कांहीं तेणेंचि घडे ।
प्राणी विवेकें पवाडे । तेणेंचि योगें ॥ २२ ॥
जागृतीस व्यापार घडतो । समंध तयासीच पडतो ।
स्वप्नामधें घडे जो तो । येणेंचि न्यायें ॥ २३ ॥
अखंड ध्यानाचें लक्षण । अखंड देवाचें स्मरण ।
याचें कळतां विवरण । सहजचि घडे ॥ २४ ॥
सहज सांडून सायास । हाचि कोणीयेक दोष ।
आत्मा सांडून अनात्म्यास । ध्यानीं धरिती ॥ २५ ॥
परी तें धरितांहि धरेना । ध्यानीं येती वेक्ति ना ।
उगेंचि कष्टती मना । कासाविस करूनी ॥ २६ ॥
मूर्तिध्यान करिता सायासें । तेथें येकाचें येकचि दिसे ।
भासों नये तेंचि भासे । विलक्षण ॥ २७ ॥
ध्यान देवाचें करावें । किंवा देवाल्याचें करावें ।
हेंचि बरें विवरावें । आपले ठाई ॥ २८ ॥
देह देउळ आत्मा देव । कोठें धरूं पाहातां भाव ।
देव वोळखोन जीव । तेथेंचि लावावा ॥ २९ ॥
अंतरनिष्ठा ध्यान ऐसें । दंडकध्यान अनारिसें ।
प्रत्ययेविण सकळ पिसें । अनुमानध्यान ॥ ३० ॥
अनुमानें अनुमान वाढे । ध्यान धरितां सवेंचि मोडे ।
उगेचि कष्टती बापुडे । स्थूळध्यानें ॥ ३१ ॥
देवास देहधारी कल्पिती । तेथें नाना विकल्प उठती ।
भोगणें त्यागणें विपत्ति । देहयोगें ॥ ३२ ॥
ऐसें मनी आठवतें । विचारितां भलतेंचि होतें ।
दिसों नये तें दिसतें । नाना स्वप्नीं ॥ ३३ ॥
दिसतें तें सांगतां न ये । बळें भावर्थ धरितां नये ।
साधक कासाविस होये । अंतर्यामीं ॥ ३४ ॥
सांगोपांग घडे ध्यान । त्यास साक्ष आपुलें मन ।
मनामध्यें विकल्पदर्शन । होऊंच नये ॥ ३५ ॥
फुटक मन येकवटिलें । तेणें तुटक ध्यान केलें ।
तेथें कोण सार्थक जालें । पाहाना कां ॥ ३६ ॥
अखंड ध्यानें न घडे हित । तरी तो जाणावा पतित ।
हाचि अर्थ सावचित । बरा पाहावा ॥ ३७ ॥
ध्यान धरितें तें कोण । ध्यानीं आठवतें तें कोण ।
दोनीमधें अनन्य लक्षण । असिलें पाहिजे ॥ ३८ ॥
अनन्य सहजचि आहे । साधक शोधून न पाहे ।
ज्ञानी तो विवरोन राहे । समाधानें ॥ ३९ ॥
ऐसीं हे प्रत्ययाची कामें । प्रत्ययेंविण बाधिजे भ्रमें ।
लोकदंडकसंभ्रमें । चालती प्राणी ॥ ४० ॥
दंडकध्यानाचें लक्षण । धरून बैसलें अवलक्षण ।
प्रमाण आणि अप्रमाण । बाजारी नेणती ॥ ४१ ॥
मिथ्या समाचार उठविती । बाउग्याच बोंबा घालिती ।
मनांस आणितां अंतीं । आवघेंचि मिथ्या ॥ ४२ ॥
कोणीयेक ध्यानस्त बैसला । कोणीयेक सिकवी त्याला ।
मुकुट काढूनि माळ घाला । म्हणिजे बरें ॥ ४३ ॥
मनाचेथें काये दुष्काळ । जे आखुड कल्पिती माळ ।
सांगते ऐकते केवळ । मूर्ख जाणावे ॥ ४४ ॥
प्रत्यक्ष कष्ट करावे न लगती । दोरे फुलें गुंफावी न लगती ।
कल्पनेची माळ थिटी करिती । काये निमित्य ॥ ४५ ॥
बुधीविण प्राणी सकळ । ते ते अवघेचि बाष्कळ ।
तया मुर्खासीं खळखळ । कोणें करावी ॥ ४६ ॥
जेणें जैसा परमार्थ केला । तैसाच पृथ्वीवरी दंडक चालिला ।
साता पांचाचा बळावला । साभिमान ॥ ४७ ॥
प्रत्ययेंविण साभिमान । रोगी मारिले झांकून ।
तेथें अवघाची अनुमान । ज्ञान कैंचें ॥ ४८ ॥
सर्व साभिमान सांडावा । प्रत्ययें विवेक मांडावा ।
माया पूर्वपक्ष खंडावा । विवेकबळें ॥ ४९ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
अखंडध्याननिरूपणनाम समास आठवा ॥ ८ ॥ १४.८

समास नववा : शाश्वत निरूपण

॥ श्रीराम ॥

पिंडाचें पाहिलें कौतुक । शोधिला आत्मानात्मा विवेक ।
पिंड अनात्मा आत्मा येक । सकळ कर्ता ॥ १ ॥
आत्म्यास अनन्यता बोलिली । ते विवेकें प्रत्यया आली ।
आतां पाहिजे समजली । ब्रह्मांडरचना ॥ २ ॥
आत्मानात्माविवेक पिंडी । सारासारविचार ब्रह्मांडी ।
विवरविवरों हे गोडी । घेतली पाहिजे ॥ ३ ॥
पिंड कार्य ब्रह्मांड कारण । याचें करावें विवरण ।
हेंचि पुढें निरूपण । बोलिलें असे ॥ ४ ॥
असार म्हणिजे नासिवंत । सार म्हणिजे तें शाश्वत ।
जयास होईल कल्पांत । तें सार नव्हे ॥ ५ ॥
पृथ्वी जळापासून जाली । पुढें ते जळीं मिळाली ।
जळाची उत्पत्ति वाढली । तेजापासुनी ॥ ६ ॥
ते जळ तेजें शोषिलें । महत्तेजें आटोन गेलें ।
पुढें तेजचि उरलें । सावकाश ॥ ७ ॥

तेज जालें वायोपासुनी । वायो झडपी तयालागुनी ।
तेज जाउनी दाटणी । वायोचीच जाली ॥ ८ ॥
वायो गगनापासुनी जाला । मागुतां तेथेंचि विराला ।
ऐसा हा कल्पांत बोलिला । वेदांतशास्त्रीं ॥ ९ ॥
गुणमाया मूळमाया । परब्रह्मीं पावती लया ।
तें परब्रह्म विवराया । विवेक पाहिजे ॥ १० ॥
सर्व उपाधींचा सेवट । तेथें नाहीं दृश्य खटपट ।
निर्गुण ब्रह्म घनदाट । सकळां ठाईं ॥ ११ ॥
उदंड कल्पांत जाला । तरी नाश नाहीं तयाला ।
मायात्यागें शाश्वताला । वोळखावें ॥ १२ ॥
देव अंतरात्मा सगुण । सगुणें पाविजे निर्गुण ।
निर्गुणज्ञानें विज्ञान । होत असे ॥ १३ ॥
कल्पनेतीत जें निर्मळ । तेथें नाहीं मायामळ ।
मिथ्यत्वें दृश्य सकळ । होत जातें ॥ १४ ॥
जें होते आणि सवेंचि जातें । तें तें प्रत्ययास येतें ।
जेथें होणें जाणें नाहीं तें । विवेकें वोळखावे ॥ १५ ॥
येक ज्ञान येक अज्ञान । येक जाणावें विपरीत ज्ञान ।
हे त्रिपुटी होये क्षीण । तेंचि विज्ञान ॥ १६ ॥
वेदांत सिधांत धादांत । याची पाहावी प्रचित ।
निर्विकार सदोदित । जेथें तेथें ॥ १७ ॥
तें ज्ञानदृष्टीनें पाहावें । पाहोन अनन्य राहावें ।
मुख्य आत्मनिवेदन जाणावें । याचें नांव ॥ १८ ॥
दृश्यास दिसते दृश्य । मनास भासतो भास ।
दृश्यभासातीत अविनाश । परब्रह्म तें ॥ १९ ॥
पाहों जातां दुरीच्या दुरी । परब्रह्म सबाहेअंतरीं ।
अंतचि नाहीं अनंत सरी । कोणास द्यावी ॥ २० ॥
चंचळ तें स्थिरावेना । निश्चळ तें कदापी चळेना ।
आभाळ येतें जातें गगना । चळण नाहीं ॥ २१ ॥
जें विकारें वाढें मोडे । तेथें शाश्वतता कैंची घडे ।
कल्पांत होताच विघडे । सकळ कांहीं ॥ २२ ॥
जे अंतरींच भ्रमलें । मायासंभ्रमें संभ्रमलें ।
तयास हें कैसें उकले । आव्हाट चक्र ॥ २३ ॥
भिडेनें वेव्हार निवडेना । भिडेनें सिधांत कळेना ।
भिडेनें देव आकळेना । आंतर्यामीं ॥ २४ ॥
वैद्याची प्रचित येईना । आणी भीडहि उलंघेना ।
तरी मग रोगी वांचेना । ऐसें जाणावें ॥ २५ ॥
जेणें राजा वोळखिला । तो राव म्हणेना भलत्याला ।
जेणें देव वोळखिला । तो देवरूपी ॥ २६ ॥
जयास माईकाची भीड । तें काये बोलेल द्वाड ।
विचार पाहातां उघड । सकळ कांहीं ॥ २७ ॥
भीड मायेऐलिकडे । परब्रह्म तें पैलीकडे ।
पैलीकडे ऐलीकडे । सदोदित ॥ २८ ॥
लटिक्याची भीड धरणें । भ्रमें भलतेंचि करणें ।
ऐसी नव्हेंतीलक्षणें । विवेकाचीं ॥ २९ ॥
खोटें आवघेंचि सांडावें । खरें प्रत्ययें वोळखावें ।
मायात्यागें समजावें । परब्रह्म ॥ ३० ॥
तें मायेचें जें लक्षण । तेंचि पुढें निरूपण ।
सुचितपणें विवरण । केलें पाहिजे ॥ ३१ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
शाश्वतनिरूपणनाम समास नववा ॥ ९ ॥ १४.९

समास दहावा : मायानिरूपण

॥ श्रीराम ॥

माया दिसे परी नासे । वस्तु न दिसे परी न नासे ।
माया सत्य वाटे परी मिथ्या असे । निरंतर ॥ १ ॥
करंटा पडोनि उताणा । करी नानापरी कल्पना ।
परी तें कांहींच घडेना । तैसी माया ॥ २ ॥
द्रव्यदारेचें स्वप्नवैभव । नाना विळासें हावभाव ।
क्षणीक वाटे परी भाव । तैसी माया ॥ ३ ॥
गगनीं गंधर्वनगरें । दिसताती नाना प्रकारें ।
नाना रूपें नाना विकारें । तैसी माया ॥ ४ ॥
लक्षुमी रायेविनोदाची । बोलतां वाटे साची ।
मिथ्या प्रचित तेथीची । तैसी माया ॥ ५ ॥
दसऱ्याचे सुवर्णाचे लाटे । लोक म्हणती परी ते कांटे ।
परी सर्वत्र राहाटे । तैसी माया ॥ ६ ॥
मेल्याचा मोहोछाव करणें । सतीचें वैभव वाढविणें ।
मसणीं जाउनी रुदन करणें । तैसी माया ॥ ७ ॥
राखेसी म्हणती लक्षुमी । दुसरी भरदोरी लक्षुमी ।
तिसरी नाममात्र लक्षुमी । तैसी माया ॥ ८ ॥
मुळीं बाळविधवा नारी । तिचें नांव जन्मसावित्री ।
कुबेर हिंडे घरोघरी । तैसी माया ॥ ९ ॥
दशअवतारांतील कृष्णा । उपजे जीर्ण वस्त्रांची तृष्णा ।
नदी नामें पीयुष्णा । तैसी माया ॥ १० ॥
बहुरूपांतील रामदेवराव । ग्रामस्तांपुढे दाखवी हावभाव ।
कां माहांराज म्हणोनि लाघव । तैसी माया ॥ ११ ॥
देव्हारां असे अन्नपूर्णा । आणी गृहीं अन्नचि मिळेना ।
नामें सरस्वती सिकेना । शुभावळु ॥ १२ ॥
सुण्यास व्याघ्र नाम ठेविलें । पुत्रास इंद्रनामें पाचारिलें ।
कुरूप परी आळविलें । सुंदरा ऐसें ॥ १३ ॥
मूर्ख नामें सकळकळा । राशभी नामें कोकिळा ।
नातरी डोळसेचा डोळा । फुटला जैसा ॥ १४ ॥
मातांगीचें नाम तुळसी । चर्मिकीचें नाम कासी ।
बोलती अतिशूद्रिणीसी । भागीरथी ऐसें ॥ १५ ॥
साउली आणी अंधकार । येक होतां तेथीचा विचार ।
उगाचि दिसे भासमात्र । तैसी माया ॥ १६ ॥
श्रवण बोटें संधी करतळ । रविरश्मे दिसती इंगळ ।
रम्य आरक्तकल्होळ । तैसी माया ॥ १७ ॥

भगवें वस्त्र देखतां मनाला । वाटे अग्नचि लागला ।
विवंचितां प्रत्ये आला । तैसी माया ॥ १८ ॥
जळीं चरणकरांगुळें । आखुड लांबें जिरकोळें ।
विपरीत काणें दिसती जळें । तैसी माया ॥ १९ ॥
भोवंडीनें पृथ्वी कलथली । कामिणीनें पिवळी जाली ।
सन्यपातस्थां अनुभवली । तैसी माया ॥ २० ॥
कोणीयेक पदार्थविकार । उगाचि दिसे भासमात्र ।
अनन्याचा अन्य प्रकार । तैसी माया ॥ २१ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
मायानिरूपणनाम समास दहावा ॥ १० ॥ १४.१०
॥ दशक चौदावा समाप्त ॥

Encoded and proofread by Vishwas Bhide.
Reproofread by P. D. Kulkarni